महाराष्ट्र महानगरपालिकांमधील नामनिर्देशित
सदस्यांची अर्हता व नियुक्त्या नियमात
सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- बीएनएम-५००७/२३२/प्र.क्र.६१/०७/नवि-३२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २८ फेब्रुवारी, २०१२

शासन निर्णय :- सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या असाधारण भाग एक- अ- मध्य उप-विभाग यामध्ये मराठी व नंतर इंग्रजी अशा रितीने दि. २८ फेब्रुवारी, २०१२ रोजी प्रसिध्द करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( आ.श्रा.जिवने )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४ त्यांना विनंती करण्यात येते की, शासन निर्णयाप्रमाणे अधिसूचना शासनाच्या असाधारण राजपत्रात भाग-एक-अ, उपविभागामध्ये प्रसिध्द करुन त्याच्या प्रती खालील सर्व संबंधितांना पाठवाव्यात आणि १००० प्रती या विभागास पाठवाव्यात.
२. महापौर, सर्व महानगरपालिका,
३. आयुक्त तथा संचालक,नगरपालिका प्रशासन संचालनालय,वरळी,मुंबई-३०,
४. आयुक्त, सर्व महानगरपालिका (संबंधितांच्या निदर्शनास आणण्यासाठी),
५. सर्व विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,
६. सर्व जिल्हाधिकारी (त्यांना विनंती की या अधिसूचनेस त्यांच्या जिल्हयात त्वरीत व्यापक प्रसिध्दी द्यावी. त्यांच्या जिल्हयातील सर्व नगरपालिकांच्या सूचना फलकावर या अधिसूचनेच्या प्रती लावाव्यात. सर्व नगरपालिका सदस्यांना अधिसूचनेच्या प्रती पुरवाव्यात.),
७. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मुंबई, त्यांना विनंती करण्यात येते की, या अधिसूचनेस राज्यात व्यापक प्रसिध्दी द्यावी.
८. संचालक,अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, उत्तर भारतीय संघाजवळ,वांद्रे(पूर्व),मुंबई-५१
९. निवड नस्ती(नवि-३२), नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

D:\shubhangi\ad 32GR ORINANCE

अधिसूचना
नगर विकास विभाग
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:-२८ फेब्रुवारी, २०१२

रपालिका नियम. प्रांतिक रपालिका नियम, नागपूर रपालिका नियम,

क्रमांक :- बीएनएम- २००७/२३२/प्र.क्र.६१/०७/नवि-३२, ज्याअर्थी राज्यातील पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी त्यांची अर्हता आणि नामनिर्देशनाच्या कार्यपध्दतीबाबत तातडीने नियम करण्याची गरज उदभवली आहे आणि त्या प्रयोजनार्थ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) चे कलम ४५६अ चे पोट कलम (२) आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २) च्या कलम ४२० चे पोट कलम (२) अंतर्गत पूर्व प्रसिध्दीची शर्त काढून टाकणे यामुळे आवश्यक झाले अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबाबत महाराष्ट्र शासनाची खात्री पटली आहे.

त्याअर्थी, आता, मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा मुंबई तीन) चे कलम ५च्या पोट कलम (१) चे खंड (ब) व कलम २९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) चे कलम ५ च्या पोट-कलम (२) चे खंड(ब) व कलम ४५६-अ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,१९४८ (१९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड दोन) चे कलम ९ च्या पोट–कलम (१) चे खंड (ब) व कलम ४२० चे पोट कलम (१) याद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन व त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करुन आणि महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम, २००७ चे अधिक्रमण करुन आणि राज्य निवडणूक आयुक्त यांचेशी सल्लामसलत करुन महाराष्ट्र शासन याद्वारे पुढील नियम करीत आहे, ते असे :-

१. संक्षिप्त नाव .- या नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम, २०१२ असे म्हणावे.

२. व्याख्या .- (१) या नियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(अ) "महानगरपालिका" याचा अर्थ संबंधित महानगरपालिका अधिनियमांतर्गत घटीत करण्यात आलेली महानगरपालिका;

(ब) "आयुक्त" म्हणजे संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त;

(क) "संबंधित अधिनियम" म्हणजे मुंबई महानगरपालिका अधिनियम (१८८८ चा मुंबई तीन), मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई एकोणसाठ) अथवा यथास्थिती नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड दोन).

(२) या नियमामध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अनुक्रमे उक्त अधिनियमामध्ये त्यांना नेमून देण्यात आलेले अर्थ असतील.

३. पालिका सदस्यांच्या नामनिर्देशनासाठी बैठक घेणे.- नियम ४ मधील तरतुदीस अधीन राहून सार्वत्रिक निवडणुकीनंतर महापालिकेच्या पहिल्या बैठकीत महापौर आणि उपमहापौर यांची निवडणूक झाल्यानंतर, ५ व्यक्तींचे नामनिर्देशन, नामनिर्देशित पालिका सदस्य म्हणून

महानगरपालिका करील.

४. **नामनिर्देशनासाठी अर्हता.** - एखाद्या व्यक्तीकडे पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान अथव अनुभव असेल ती व्यक्ती नामनिर्देशित पालिका सदस्याच्या पदासाठी उमेदवार म्हणून नामनिर्देशि केली जाण्यास पात्र असेल, जर ती व्यक्ती, -

(क) राज्यात मान्यताप्राप्त व नोंदणीकृत वैधक व्यवसायी म्हणून किमान पाच वर्ष काम केलेल असेल, किंवा

(ख) किमान पाच वर्ष शिक्षण तज्ञ म्हणून काम केलेली असेल, यामध्ये मान्यता प्राप्त शाळ किंवा महाविद्यालयाच्या निवृत्त प्राध्यापक, व्याख्याता, मुख्याध्यापक यांचा समावेश असेल किंवा

(ग) सनदी लेखापाल किंवा परिव्यय लेखापाल म्हणून कमीत कमी ५ वर्षांचा अनुभव धार केलेली असेल, किंवा

(घ) कमीत कमी पाच वर्षांचा व्यावसायिक अनुभव असलेली मान्यताप्राप्त विद्यापीठाच अभियांत्रिकी पदवीधारक असेल, किंवा

(ङ) राज्यात कमीत कमी पाच वर्षांकरीता अधिवक्ता किंवा मान्यताप्राप्त विद्यापीठा कायद्यामधील पदवीधारक व राज्यात विधी क्षेत्रात काम करण्याचा कमीत कमी पाच वर्षां अनुभव असलेली असेल, किंवा

(च) नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी किंवा महानगरपालिकेचा सहायक आयुक्त किंवा उपायुक म्हणून काम करण्याचा किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली किंवा किमान दोन वर्षांच अनुभव असलेली महानगरपालिकेतून आयुक्त म्हणून सेवानिवृत्त झालेली असेल, किंवा

(छ) महानगरपालिका किंवा नगरपरिषद क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या आणि समाजकल्याण कार्यामध्ये गुंतलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० खाली नोंदणीकृ समाजाधिष्ठित अशासकीय संघटनेचा पदाधिकारी म्हणून किमान पाच वर्षांचा अनुभव असलेली असेल.

५. **पालिका सदस्यांचे नामनिर्देशन.**- (१) पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिकेतील सभागृह नेता, विरोधी पक्ष नेता आणि प्रत्येक मान्यताप्राप्त अथव नोंदणीकृत पक्षांच्या किंवा गटांच्या नेत्यांशी विचारविनिमय करुन आणि अशा पक्षांचे आणि गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन, महानगरपालिकेला योग्य व्यक्तीच्या नावाची नामनिर्देशित सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यासाठी शिफारस करतील. अशा शिफारस केलेल्या व्यक्तींच संख्या नियम ३ प्रमाणे शिफारस करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक नसावी.

(२) आयुक्तांनी केलेल्या शिफारशींचा विचार करुन महानगरपालिका, पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करील:

परंतु, आयुक्तांनी अशाप्रकारे शिफारस केलेल्या व्यक्तींची शिफारस महानगरपालिकेने अमान्य करावयाची ठरविल्यास त्याबाबतची कारणे महानगरपालिकेला नोंद करावी लागतील.

परंतु, आणखी असे की, नियम ४ मधील (क) ते (छ) मधील अर्हता असणाऱ्या प्रत्येकी एक व्यक्तीची पालिका सदस्य म्हणून नामनिर्देशन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करण्यात यावा.

६. पालिकेतील नामनिर्देशित सदस्यांची नांवे प्रसिध्द करणे.- याप्रमाणे नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची नावे शक्य तितक्या लवकर पालिका सचिव, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यासाठी पाठविल.

७. प्रासंगिक रिक्त पदे.- नामनिर्देशित पालिका सदस्याचे एखादे पद रिक्त होईल तेव्हा ते रिक्त पद भरण्याकरिता या नियमाच्या तरतूदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील.

८. नामनिर्देशित पालिका सदस्यांना प्रमाणपत्र देणे.- नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर आयुक्त, सोबत जोडलेल्या नमुन्यात प्रत्येक नामनिर्देशित पालिका सदस्यांना प्रमाणपत्र देईल.

नमुना
(नियम ८ पहा)
प्रमाणपत्र

..............................महानगरपालिका

मी,श्री./श्रीमती.................................................................................................
आयुक्त,..................................................... महानगरपालिका याद्वारे प्रमाणित करतो / करते की, श्री./श्रीमती ..................................................... यांचा ठराव क्रमांक.......................................दिनांक...............................अन्वये नामनिर्देशनाने ..................................................... महानगरपालिकेवर पालिका सदस्य म्हणून पाच वर्षांकरिता किंवा महानगरपालिकेच्या विद्यमान सदस्य मंडळाची मुदत समाप्त होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत नियुक्ती करण्यात आली आहे.

( )

ठिकाण:
दिनांक :

आयुक्त,
.............. महानगरपालिका

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( आ. श्रा. जिवने )
शासनाचे उप सचिव.